# आरोग्य सेवा आयुक्तालय

(महाराष्ट्र राज्य)

"आरोग्य भवन", सेंट जॉर्जेस रुग्णालय आवार, पी.डिमेलो रोड, मुंबई- ४००००१

| संचालक (वैयक्तिक) | २२६२१००६<br>२२६२०२९२ | Website : http://arogya.maharashtra.gov.in<br>Email : director.dhs-mh@gov.in |
|---|---|---|


| महत्वाचे | जा.क्र/आआसे/संचालक कक्ष/रुग्ण हक्क सनद लावणेबाबत /६०९- १५ /२०२१<br>दिनांक - १५/११/२०२१ |
|---|---|

प्रति,

उपसंचालक, परिमंडळे(सर्व)

जिल्हा शल्य चिकित्सक (सर्व)

जिल्हा आरोग्य अधिकारी (सर्व)

वैद्यकिय आरोग्य अधिकारी, महानगरपालिका (सर्व)

विषय- कोविड चार्टर आणि रुग्ण हक्क सनद राज्यातील सर्व सरकारी व खाजगी रुगणालयात दर्शनीभागात लावणेबाबत.

संदर्भ - १. मा. उपमुख्यमंत्री, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांच्या अध्यक्षतेखाली दि. ३१ मे २०२१ रोजीची झालेली सभा.

२. या कार्यालयाचे पत्र क्र. जा.क्र/आआसे/ संचालक कक्ष/आदेश/ मा.उपमुख्यमंत्री बैठक/ ५५७-६२/२०२१ दि.११/१०/२०२१

उपरोक्त विषयान्वये मा. उपमुख्यमंत्री महोदय, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांच्या अध्यक्षतेखाली दि.३१ मे २०२१ रोजी सभा पार पडली. सदर सभेमध्ये दिलेल्या निर्देशानुसार जनतेचे मानवी हक्क जोपासण्यासाठी राष्ट्रीय मानवी हक्क आयोगाने पध्दतशीर सर्वांगिण मार्गदर्शिका प्रस्तूत केली आहे. त्याचा एक भाग म्हणून राज्यातील सर्व शासकीय व खाजगी रुग्णालयात कोविड चार्टर आणि रुग्ण हक्काची सनद दर्शनीभागात लावणेबाबत सुचित करावे, असे निर्देश देण्यात आलेले आहेत.

त्यानुसार आपल्या अधिनस्त असलेल्या सर्व शासकीय तसेच खाजगी रुग्णालयात कोविड चार्टर आणि रुग्ण हक्काची सनद दर्शनी भागात लावणेबाबत आदेशीत करण्यात यावे व केलेल्या कार्यवाहीचा अनुपालन अहवाल आयुक्तालयास सादर करावा.

सहपत्र- १.Human Rights Advisory on right to health in context of COVID १९ Dated=२८th September २०२०

Scanned by TapScanner

२. भारत सरकारच्या आरोग्य आणि कुटुंब कल्याण मंत्रालयाच्या संप्रेषणानुसार सर्व आरोग्य सेवा आस्थापनांद्वारे प्रदर्शित आणि पाळल्या जाणा-या रुग्णांचे हक्क आणि जबाबदाऱ्यांची सनदेची मराठी प्रत.

(डॉ.साधना तायडे)
संचालक, आरोग्य सेवा,
महाराष्ट्र राज्य, मुंबई

प्रत माहितीस्तव सविनय सादर-

मा. आयुक्त, आरोग्य सेवा तथा संचालक,राष्ट्रीय आरोग्य अभियान, मुंबई

प्रत कार्यवाहीस्तव -

सहसंचालक, आरोग्य सेवा (रुग्णालये), मुंबई- आपल्या स्तरावरुन पाठपूरावा करण्यात यावा.

उपसंचालक, परिमंडळे (सर्व)- आपले अधिनस्त सर्व शासकीय तसेच खाजगी रुग्णालयात कोविड चार्टर आणि रुग्ण हक्काची सनद दर्शनी भागात लावणेबाबत सुचित करुन त्याबाबत योग्य ती कार्यवाही झाल्याची खातरजमा करुन आयुक्तालयास अनुपालन अहवाल सादर करावा.

Scanned by TapScanner